CNRMHAH2500 2366 2016

**<u>रे मु नं ८८८/२०१६ मध्ये नि. ५८ वर आदेश</u>**

(ज्ञानदेव बाबूराव आंधळे वि. तुकाराम बाबूराव आंधळे)

प्रतिवादी क्र. १ याने सदरचा अर्ज त्याचेविरूध्द दाव्याची कैफियत मुदतीत न दिल्यामूळे त्याच्याविरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होउन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी बाहेरगावी गेला होता व त्यानंतर तो आजारी पडला. त्यानंतर लॉकडाउनच्या आर्थिक अडचणीमुळे प्रतिवादी मुंबईवरुन पारनेर येथे न्यायालयात येउ शकला नाही. त्यामुळे प्रतिवादीस कैफियत देण्यास उशीर झालेला आहे. प्रतिवादी विरूध्द नो डब्लू एस चा आदेश झालेला आहे. प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर न घेतल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर नसल्यास त्याला त्याचे म्हणणे मांडता येणार नाही. सबब प्रतिवादी विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात यावा.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दिले आहे. वादीचे असे कथन आहे की सदरचा अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादीने आजारी असल्याबाबत वैद्यकिय प्रमाणपत्र दिलेले नाही. प्रतिवादी क्र. १ विरुध्द ४/१२/२०१९ रोजी एकतर्फा आदेश झालेला आहे. अर्ज मंजूर करायचा झाल्यास हेवी कॉस्ट करण्यात यावी.

४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीचे वकिलांचे असे कथन आहे की कागदपत्र वेळेत न मिळाल्यामुळे त्यांना दाव्याची कैफियत देण्यास उशिर झालेला आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिवादीचे वकिलांनी असा युक्तिवाद केला की सदरचा अर्ज कायद्याने दाखल करता येणार नाही त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजरू करावा.

५. अर्ज व म्हणणे वाचले. प्रतिवादी दि. ०४/०२/२०१७ रोजी दाव्यात हजर झाले. प्रतिवादींनी वेळोवेळी मुदतीचे अर्ज दिलेले आहेत. प्रतिवादी विरुध्द ०४/१२/२०१९ रोजी विना कैफियत आदेश झालेला आहे. सदरचा अर्ज प्रतिवादीने दि. १६/१२/२०२० रोजी दिलेला आहे. प्रतिवादीस कैफियत देण्यास बराच कालावधी लागला आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ ची कैफियत अभिलेखावर येणे देखील गरजेचे आहे. न्यायाच्या दृष्टीने दाव्याची कैफियत दाखल करून घेणे आवश्यक आहे. सदर कैफियत दाखल करून घेतल्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल होण्यास मदत होणार

आहे. वादीचे त्यामुळे काही नुकसान होणार नाही पंरतु प्रतिवादीने सदर कैफियत दाखल करण्यास बराच विलंब केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने ३००/- रूपये देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी  खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र १ याने वादीस खर्च म्हणुन रक्कम रूपये ३००/- देण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम भरल्यास त्यांच्या विरूध्द केलेला विना  कैफियत आदेश रद्द करण्यात येतो.

**सही/-**

दि.  २७/१०/२०२१

(डी. आर. बडवे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारनेर